**Publication: Lokmat** **Date: Wednesday, 13th January, 2016**

**Edition: Mumbai**

# पेन्शन क्षेत्रात नवा कोष

नवी दिल्ली : खाजगी क्षेत्रातील कंपनी इंडिया फर्स्ट लाईफ इन्शुरन्सने सेवानिवृत्ती योजना जाहीर केली आहे. हमखास परतावा देणारी ही योजना असल्याचे कंपनीच्या वतीने सांगण्यात आले. ही दीर्घकालीन योजना असून सुरुवातीच्या काळातील एकूण हप्त्यांवर ९ टक्के व्याजदर तिच्यावर मिळू शकतो, तसेच इतरही काही लाभ कंपनी देणार आहे. कंपनीच्या मुख्य कार्यकारी आर. एम. विशाखा यांनी ही माहिती दिली.